दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.२१ फेब्रुवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएचएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १७७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 21 Feburary 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 177 ● Pages 4 ● Rate 4 Rs


### शक्तीपीठ महामार्गाला परभणीत तीव्र विरोध:

**मुंबई**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाला परभणी जिल्ह्यातील सहजपूर येथे शेतकऱ्यांनी आज (२० फेब्रुवारी) रस्त्यावर उतरून तीव्र विरोध दर्शवला. भूसंपादनाच्या प्रक्रियेमुळे संतापलेल्या शेतकऱ्यांनी आमच्या जमिनी घेण्यापेक्षा आम्हाला गोळ्या घाला, अशा टोकाच्या घोषणा देत आपला रोष व्यक्त केला. विशेष म्हणजे, अवघ्या ३५० लोकसंख्या असलेल्या या गावात प्रशासनाने ६०० हून अधिक पोलिसांचा फौजफाटा तैनात केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला. यावर आता काँग्रेस नेते सतेज पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.सतेज पाटील म्हणाले, गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग रेटण्यासाठी महायुती सरकारने दडपशाहीची परिसीमा गाठली आहे. परभणी जिल्ह्यात सहजापूर (जवळा) या गावामध्ये रात्रीपासून शेतकऱ्यांना अटक, घरांवर नोटिसा, आंदोलकांना ताकदीच्या बळावर ताब्यात घेणे आणि महिला भगिनींना फरपटत नेण्याचे निंदनीय प्रकार पोलीसांमार्फत सरकार करत आहे०

# छगन भुजबळ राज्यसभेवर जातील: अजितदादा ओघात म्हणाले होते-अमोल कोल्हेंचा गौप्यस्फोट

### विरोधाला चेहरा नसतो तेव्हा विचारांची भीती असते

तसेच मला असे वाटते की जेव्हा विरोधाला चेहरा नसतो तेव्हा विचारांची भीती ही त्यांच्या मनात बसलेली असते तेव्हा विरोधाला असा कोणतातरी मुखवटा घेऊन पुढे यायचा प्रयत्न होतो, तसा काही प्रकार असेल, असे अमोल कोल्हे यांनी म्हटले. तसेच चेहरा जर समोर आला असता आणि नेमका काय विरोध आहे हे कळले असते तर मला त्यांच्याशी संवाद सधायला बरं वाटलं असतं, असेही कोल्हे यांनी म्हटले.पुढे बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, छत्रपती मांडत असताना बाबा कधी कोणाला घाबरायचं नसतं, कधी कोणाचा इतर विचार करायचा नसतो. जोपर्यंत तुम्ही प्रामाणिकपणे छत्रपती मांडताय न तोपर्यंत कोणाच्या बापाला या महाराष्ट्रात घाबरायचे कारण नाही.

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

अभिनेते व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांचे पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. परंतु, या व्याख्यानाला काही संघटनांनी विरोध केल्याचे पाहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठात पोलिसांचा बंदोबस्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अमोल कोल्हे यांनी पत्रकारांशी संवाद देखील साधला आहे. यावेळी बोलताना त्यांनी म्हटले की, जोपर्यंत तुम्ही छत्रपती मांडताय तोपर्यंत या महाराष्ट्रात कोणाच्या बापाला घाबरायचे नाही. तसेच छगन भुजबळ हे राज्यसभेवर जातील, असे अजितदादा ओघात म्हणाले असल्याचा गौप्यस्फोट देखील कोल्हे यांनी केला आहे.पत्रकारांशी बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, मला विरोध का केला गेला हे मला माहित नाही. परंतु सावित्रीबाई फुले विद्यापीठाने मला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जे व्याख्यान आयोजित करायचे होते, या संदर्भात काही विद्यार्थ्यांनी ही मागणी केली होती. त्यानुसार मला विद्यापठाणे निमंत्रण दिले. मला आत्ता काही माध्यमकर्मींकडूनच समजत आहे की काही संघटनांनी मला विरोध केला आहे. परंतु, यांची कुठलीही कल्पना नाही. आज मी इतह इथे आलो आहे. माझी विरोध करणाऱ्यांना विनंती आहे, की त्यांनी माझे व्याख्यान ऐकावे आणि प्रश्न विचारा.



### छत्रपतींची भूमिका साकारतो तेव्हा राजकारणाचे जोडे बाहेर ठेवतो

पुढे बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, विरोध करणे ही काही नवीन गोष्ट नाही. कारण ज्या छत्रपतींच्या विषयी बोलायला येतोय, त्या शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला देखील विरोध झाला आहे. याच पुण्यात त्यांच्या अश्वारूढ पुतळ्याला देखील विरोध झाला आहे. पहिला पुतळा उभारण्याला सुद्धा विरोध झाला आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी ही तब्बल १८० वर्ष लोकांच्या स्मरणात राहिली नाही. याही वस्तुस्थिती आहेत. त्यामुळे मला असे वाटते की कुठलेही व्याख्यान करणे विद्यार्थ्यांशी संवाद साधणे हा वैचारिक भाग आहे. आणि मी जेव्हाही छत्रपतींची भूमिका साकारतो तेव्हा राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून करतो.


# हार–पुष्पगुच्छ नकोत विद्यार्थ्यांसाठी वही–पेन द्या

### शिक्षण समिती अध्यक्ष श्रीमती राजेश्री शिवरवडकर यांचे नागरिकांना आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज शिक्षण समिती अध्यक्षपदाच्या शुभेच्छा देताना कोणीही हार, पुष्पगुच्छ अथवा अन्य भेटवस्तू आणू नयेत. त्याऐवजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या उपयोगी ठरणारी पुस्तके, वह्या, लेखन साहित्य किंवा अन्य शैक्षणिक वस्तू शुभेच्छा किंवा भेट म्हणून आणाव्यात, असे आवाहन बृहन्मुंबई आज या महानगरपालिकेच्या शिक्षण समिती अध्यक्षा श्रीमती राजेश्री राजेश शिरवडकर यांनी केले आहे. तसेच या हार – पुष्पगुच्छ क्षणिक सन्मानाचे प्रतीक असले, तरी विद्यार्थ्यांसाठी दिलेले शैक्षणिक साहित्य त्यांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी अधिकृतपणे



उपयुक्त ठरते. या उपक्रमामुळे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना थेट शैक्षणिक मदतीसाठी मिळून आवश्यक मूलभूत साधनांची पूर्तता होणार आहे. औपचारिक शुभेच्छांऐवजी शिक्षणात गुंतवणूक करण्याचा हा सकारात्मक व सामाजिकदृष्ट्या उपयुक्त संदेश असल्याचे श्रीमती शिरवडकर यांनी स्पष्ट केले आहे.आज या सर्व महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक बळकटीकरण व्हावे, त्यांना आवश्यक साहित्य वेळेवर मिळावे आणि समाजात शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा, या उद्देशाने हे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनीही आपली सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमाला उत्साहाने प्रतिसाद द्यावा, असे श्रीमती राजेश्री शिरवडकर यांनी म्हटले आहे.

# उंदरी येथे शिवजयंती साजरी,छावा संघटनेचे जिल्हा प्रमुख शिवाजी दादा ठोंबरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

उंदरी येथे स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले तसेच जिजाऊ वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने लहान मुला–मुलींसाठी भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांची राजनीति,युद्धनीती, स्त्रियांचा आदर करण्याची शिकवण तसेच शिवरायांची आदर्श वागणूक यावर प्रभावी विचार मांडले. उपस्थितांनी चिमुकल्यांच्या ओजस्वी वक्तृत्वाला भरभरून दाद दिली.स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या



११ मुला–मुलींना रोख रक्कम,शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. यावेळी छावाचे जिल्हा प्रमुख शिवाजी दादा ठोंबरे,डॉक्टर बिभीषण ठोंबरे,सुदाम दादा ठोंबरे, नाना ठोंबरे,दीपक सोनवणे,लक्ष्मीकांत ठोंबरे,नाना जाधव, विलास कुरवडे,धनंजय ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रमोद ठोंबरे सर यांनी केले. कार्यक्रमास ग्रामस्थ व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उंदरी येथे शिवजयंती उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

# हत्तीरोग निर्मूलनासाठी सर्वांनी औषधांचे सेवन करा

### आ.मुनगंटीवार यांचे जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या हत्तीरोग निर्मूलनाच्या सार्वत्रिक औषधोपचार मोहिमेत सर्व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा आणि आरोग्य विभागाकडून दिली जाणारी औषधे वेळेवर सेवन करावीत, असे आवाहन राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत राष्ट्रीय हत्तीरोग दूरिकरण कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात १० ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबविण्यात येत आहे.ही मोहीम हत्तीरोग निर्मूलनासाठी अत्यंत महत्त्वाची असून, दोन वर्षांखालील बालके, गर्भवती माता व गंभीर आजारांनी ग्रस्त व्यक्ती वगळता सर्व पात्र नागरिकांना प्रतिबंधात्मक औषधे देण्यात येणार आहेत. ही औषधे सुरक्षित व प्रभावी असून, रोगाचा प्रसार थांबविण्यासाठी नागरिकांनी न चुकता सेवन करणे आवश्यक आहे.आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नागरिक, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक यंत्रणांनी या मोहिमेत सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. तसेच आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीतच गोळ्यांचे सेवन करावे आणि त्या उपाशीपोटी घेऊ नयेत, असेही त्यांनी



स्पष्ट केले. प्रत्येक घरापर्यंत पोहोचणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करून औषधांचे सेवन करावे, असे त्यांनी सांगितले. हत्तीरोगमुक्त महाराष्ट्रासाठी सर्वांनी एकत्रितपणे या मोहिमेला यशस्वी करावे, असेही आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले.

# रोहित पवारांच्या सुरक्षेची जबाबदारी राज्य सरकारने घ्यावी-सुप्रिया सुळेंची मागणी

### रोहित पवार जनतेच्या मनातील प्रश्न मांडत असल्याचा दावा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेनंतर निर्माण झालेल्या शंका–कुशंकांना आता नवे वळण मिळाले आहे. अपघात की घातपात, या चर्चेमुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या प्रकरणी अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार सातत्याने प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांकडूनही काही शंका व्यक्त करण्यात आल्या. आता खासदार सुप्रिया सुळे यांनीही मौन सोडत या प्रकरणावर पहिल्यांदाच स्पष्ट भूमिका मांडली आहे.गेल्या महिन्यात २८ जानेवारी रोजी अजित पवार यांचे विमान कोसळले आणि त्यात त्यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. मात्र काही दिवसांनंतर या दुर्घटनेविषयी अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले. रोहित पवार यांनी तीन वेळा पत्रकार परिषद घेऊन तपासाच्या गतीबाबत नाराजी व्यक्त केली. त्यांनी काही तांत्रिक बाबी आणि संबंधित कंपनीबाबत शंका उपस्थित करत तपास अधिक वेगाने आणि निष्पक्ष व्हावा, अशी मागणी केली.या पार्श्वभूमीवर अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनीही सामाजिक माध्यमांवर पोस्ट करून 'ब्लॅक बॉक्स' संदर्भात शंका व्यक्त केली. विमान दुर्घटनेत ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाही, असे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील जनतेला या घटनेचे संपूर्ण, पारदर्शक आणि निर्विवाद सत्य जाणून घेण्याचा हक्क आहे, असे त्यांनी लिहिले. तसेच संबंधित उड्डाण सेवा देणाऱ्या कंपनीवर बंदी घालण्याची मागणीही त्यांनी केली. त्यामुळे या प्रकरणातील चर्चेला आणखी धार मिळाली.या सर्व घडामोडींनंतर सुप्रिया सुळे यांनी सामाजिक माध्यमावर सविस्तर भूमिका मांडली. त्यांनी म्हटले की, अजितदादांच्या अपघाती मृत्यूनंतर महाराष्ट्र हादरला आहे. समाजमाध्यमांवर अनेक शंका व्यक्त केल्या जात आहेत आणि जनभावना तीव्र आहेत. लोक अजूनही शोकातून सावरलेले नाहीत. अशा वेळी रोहित पवार अभ्यासपूर्ण



पद्धतीने काही मुद्दे मांडत आहेत. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळालीच पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले.सुळे यांनी पुढे नमूद केले की, जर तपासात उशीर होत असेल तर अस्वस्थता वाढण्याची शक्यता आहे. ती टाळण्यासाठी संपूर्ण सत्य पारदर्शकपणे लोकांसमोर येणे आवश्यक आहे. व्यवस्थेला प्रश्न विचारणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनादत्त अधिकार आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. रोहित पवार हे जनतेच्या मनातील प्रश्न मांडत असल्याचे सांगत त्यांनी त्यांना योग्य प्रतिसाद मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.याचबरोबर सुप्रिया सुळे यांनी रोहित पवार यांच्या सुरक्षेचा मुद्दाही उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर त्यांना कडेकोट सुरक्षा मिळणे अत्यंत गरजेचे असून त्यांच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी राज्य सरकारने घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. कालच्या पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी आपल्या कुटुंबीयांना त्यांच्या सुरक्षेबाबत चिंता वाटत असल्याचे सांगितले होते. त्यामुळे सुळे यांच्या मागणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर सुरू झालेली ही चर्चा आता अधिक गंभीर होत चालली आहे. कुटुंबीयांकडून उपस्थित होणारे प्रश्न, ब्लॅक बॉक्सबाबतची शंका, तपासाच्या गतीवरील नाराजी आणि आता सुप्रिया सुळे यांची पारदर्शक चौकशीची मागणी यामुळे या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुढील काही दिवसांत तपास यंत्रणा काय भूमिका घेते आणि शंकांचे निरसन कसे होते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# संपादकीय

## संशयाचं धुकं

विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याची माहिती आल्याने या प्रकरणाच्या चर्चेत आणखी वाढ झाली. तथ्य किती किंवा शक्यता किती याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमकं हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखं नाही.अजितदादांच्या अपघाती निधनाने सामान्य माणूस अजूनही बुचकळ्यात आहे. एखाद्या अनपेक्षित घटनेचा धक्का एवढा मोठा असतो, की घटना घडून गेल्यानंतरही बरेच दिवस ती घटना मनाला स्वीकारता येत नाही. सत्य कळत असतं, पण त्यावर विश्वास ठेवायला मन तयार नसतं. एका बाजूला अनपेक्षित, अविश्वसनीय घटना आणि त्यानंतर समाज माध्यमांवरून फिरत असलेल्या अजितदादांच्या अनेक चित्रफिती. त्यात भर आमदार रोहित पवार यांच्याकडून व्यक्त होत असलेल्या संशयाची. अपघात हे खरं तर अतार्किकच असतात. त्यामुळे, तर्काने त्यात अनेक प्रश्न उपस्थित होतच असतात. काही सर्वसामान्यांच्या मनात असलेले प्रश्न, काही तज्ज्ञांचे प्रश्न, आपल्याकडे प्रत्येक व्यवस्थेत असलेल्या अव्यवस्था आणि नेमक्या त्याच दिवशी घडलेल्या काही अपवादात्मक त्रुटी या सगळ्यांची गोळाबेरीज रोहित यांच्या प्रश्न आणि संशयात असल्याने त्या अपघाताभोवतीचं गूढ वाढत चाललं आहे. रोहित यांच्या आरोपवजा प्रश्नांना सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रवक्ते आनंद परांजपे यांनी उत्तरं दिली. पण, तरीही रोहित यांच्या पत्रकार परिषदा थांबेनात आणि त्यांच्या समर्थनार्थ अजितदादांचे धाकटे चिरंजीव जय पवारही आले, तेव्हां राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उत्तरं द्यायला सुरुवात केली. रोहित यांच्या नेमक्या प्रश्नांना खरे तर हवाई वाहतूक विभागाशी संबंधित यंत्रणांनी उत्तर द्यायला हवं होतं किंवा निदान तज्ज्ञांचे अहवाल येईपर्यंत वाट बघण्याचं आवाहन तरी करायला हवं होतं. पण, विमान ज्या खासगी कंपनीचं होतं, त्या कंपनीने आपल्या बाजूने अजून तरी कोणतीच वस्तुस्थिती उघड न केल्याने आणि हवाई प्रवासी वाहतूक विभागाशी संबंधित नियंत्रक संस्थांनीही अजून तपासातील प्रगती अधिकृतरीत्या जनतेसमोर न ठेवल्याने रोहित यांच्या प्रश्नांची धार वाढत चालली आहे. सर्वसामान्य माणसालाही त्यामुळे काही प्रश्न पडू लागले आहेत.अजितदादांच्या अपघाती निधनानंतर त्याविषयी पहिली शंका व्यक्त केली, ती पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी. ममता यांचा संशय पसरू नये आणि या दुःखद घटनेला वेगळं वळण लागू नये, तो राजकारणाचा विषय होऊ नये, यासाठी शरद पवार यांनी तातडीने माध्यमांसमोर येऊन खुलासा केला. पण, त्यानंतर ही जबाबदारी खुद्द त्यांचे नातू रोहित यांनीच घेतली! राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते, आमदार अमोल मिटकरी ही या अपघाताबाबत प्रश्न उपस्थित करणारी दुसरी राजकीय व्यक्ती होती. ममतादीदींनी विषय नंतर सोडून दिला. मिटकरीही फार बोलले नाहीत. पण, रोहित या संदर्भातील तांत्रिक व परिस्थितीजन्य माहिती गोळा करू लागले. खासगी गुप्तहेरांमार्फतही काही माहिती गोळा करणार असल्याचं त्यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केलं. मुंबई आणि दिल्लीत त्यांनी माध्यमांसमोर सादरीकरणही केलं आणि त्याला धरून रोज काही ना काही मुद्दे मांडत राहिले. त्यामुळे संशयाचं वादळ मनामनांत घोंघावतं आहे. घराघरांत त्याची चर्चा सुरू आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याचं सांगितलं गेल्याने अविश्वासात भर पडली आहे. तथ्य किती किंवा तथ्याच्या शक्यता किती, याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रत्येकाच्या डोक्यातील प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमकं हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखं नाही.

रोहित पवार आणि अजितदादांचं कुटुंब तांत्रिकदृष्ट्या वेगवेगळ्या पक्षात आहेत. रोहित आणि अजितदादांच्या पक्षातील 'अन्य' नेत्यांचा राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावरही दादांच्या मृत्यूनंतर वाद झाला होता. त्यामुळे, रोहित यांच्या या आरोपांनाही त्या नेत्यांकडून त्याच पद्धतीने उत्तरं दिली जातील, असं वाटत असतानाच एके दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या पार्थ पवार आणि पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटल्या. त्यांनी या अपघाताची सीबीआय या केंद्रीय यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी केली. अजितदादांनंतर सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री असताना, संपूर्ण पक्ष सत्ताधारी महायुतीत सहभागी असताना आणि फडणवीस यांच्यासोबत एकूण एक पक्षाचे मधुर संबंध असताना अचानक ही मागणी का व्हावी? रोहित यांना रोखण्यासाठी, पक्षांतील खदखद थांबवण्यासाठी, की हितचिंतक मतदारांना दिलासा देण्यासाठी? फडणवीस यांचा दिल्ली दौरा ठरला होताच. त्यामुळे, त्यांनीही या शिष्टमंडळाला 'माझी केंद्रीय गृहमंत्र्यांबरोबर भेट होणार आहे. आपली मागणी मी त्यांच्यापर्यंत नक्की पोहोचवतो' असं आश्वासन दिलं. पुढे काय? ते थोड्याच दिवसांत कळेल.राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकलं झाल्यापासून या दोन्ही पक्षातले संबंध त्या पक्षांच्या सर्वोच्च नेत्यांतील भावनिक संबंधांवर हेलकावे खात होते. दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाचा विषयही त्याचाच भाग होता. आपल्याबरोबरच्या नेत्यांचं काहीही मत असलं, तरी पक्षाच्या अगदी खालच्या थरातील कार्यकर्त्यांच्या आणि मतदाराच्या मनात काय आहे, याची कल्पना अजितदादांना होती. १२ फेब्रुवारीचा मुहूर्त त्यांनी म्हणूनच नक्की केला होता. महानगरपालिकेच्या निवडणुकीतील प्रचारसभांत ते या एकत्रिकरणाबद्दल उपस्थित जनसमुदायाला आश्वासित करत असत. त्याचे अनेक व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर भरपूर फिरताहेत. राजकारण्यांसाठी राजकीय सोय सर्वाधिक महत्त्वाची असते. ते साहजिकही आहे. राष्ट्रवादीचे दोन भाग झाले, ते या सोयीसाठी आणि आता त्या पक्षाचे वरिष्ठ नेते एकत्रिकरणाच्या विचारापासून पक्षाला शक्य तितक्या लांब घेऊन जाऊ पाहताहेत, तेही त्यासाठीच. अपघाताबद्दलचे प्रश्न आणि त्याच्या चौकशीच्या मागण्या या सोयी - गैरसोयीचा भाग होऊ नयेत, एवढीच घराघरांतल्या सर्वसामान्य माणसाची अपेक्षा असेल.

# मोलगी-धडगाव परिसरात लहानग्यांच्या पेटणाऱ्या होळीने होतंय प्रकाशमय वातावरण

## अवघा सातपुडा पर्वत होळीमायच्या जयघोष्यात न्हाहून निघत आहे

दैनिक वादळ वार्ता

मोलगी । रविंद्र वळवी

सातपुडयातील आदिवासींमध्ये होळी या सणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.आदिवासींच्या होळी सणाच्या एक महिन्याआधी बालगोपालांच्या होळीला सुरूवात होते. संध्या लहान मुलांच्या होळी पर्वाला सुरूवात झाली असुन बाळ गोपालांच्या आनंदाला उधाण आले आहे. सातपुडा परिसरात विशेषतः धडगांव व मोलगी परिसरात रोज रात्री सर्वत्र ओर्यीीी ओायओाय .. ओाय.. ओाय.. असा लहान मुलांचा आवाज घुमू लागला आहे.सातपुडा परीसरातील आदिवासीच्या होळी सणाला सुरूवात होण्याच्या एक महिना पुर्वी लहान मुलांच्या होळीला सुरूवात होते. होळी सणात ज्येष्ठ मंडळी ज्या पध्दतीने विधी करतात त्याचे अनुकरण करीत लहान मुले सुध्दा अगदी तशाच प्रकारची होळीची विधी करण्याचा प्रयत्न करतात. सर्व प्रथम पाडयातील किंवा जवळपासची बहुतेक लहान मुले एकत्र येऊन बैठक घेतात.बैठकीत होळीसाठी दांडा कोणी व कुठून आणायचा याची जबाबदारी दिली जाते.अंधार होण्यापुर्वी हा दांडा होळी ज्या ठिकाणी पेटविली जाणार आहे तेथे आणुन ठेवायचा असतो. त्यानंतर होळी पेटविण्यासाठी काड्या - कुड्या, लाकडे कोणी गोळा करायचे यासह बारीकसारीक गोष्टीचे



सामुहिकपणे नियोजन केले जाते.

मोठया मंडळीच्या होळी प्रमाणे लहान मुले सुध्दा ठरलेल्या वेळेत होळी पेटविण्याच्या ठिकाणी एकत्र जमा होतात. होळीचा दांडा रोवण्यासाठी खड्डा खोदतात. त्यात दांडा रोवतात,आजुबाजूला काड्या,कुड्या,लाकडे,पाला पाचोळा अगदी व्यवस्थित रचतात.त्यानंतर त्यांच्या आनंदाला खरी सुरुवात होते.सर्व लहान मुले मिळेल त्या साहित्याला आपले वाद्य बनवुन त्याला लयबद्ध पद्धतीने एका तालीवर वाजवित होळीच्या दांडया भोवती जमेल त्या पध्दतीने नृत्य करतात. मोठया लोकांच्या होळी प्रमाणे बावा -बुध्या, काली,गेर व अन्य प्रकारचे खोटे नाटे सोंग घेऊन नाचत असतात.

त्यानंतर त्यांच्या ठरलेल्या वेळेला होळी पेटविण्यात येते. होळी पेटविल्यानंतर ओर्यीीी ओय ओय ओय. ओाय. असा विशिष्ट प्रकारचा आवाज मोठमोठयाने काढत होळी भोवती आपले बनावटी वाद्य वाजवत फेर धरून नृत्य करतात. यावेळी लहान मुलांच्या आनंदाला उधाण आलेले असते. होळीची राख झाल्यानंतर मुलांना जमेल त्या पध्दतीने विधी करतात. त्याच सोबत प्रत्येक घरात त्या दिवशी जो स्वयंपाक झाला असेल तो थोडा -थोडा सर्व मुले घेऊन येतात आणि त्याला एका परातीत एकत्र करून त्याला एक जीव केले जाते. त्याचा प्रसाद सर्व मुलांना दिला जातो. हा प्रसादचा आस्वाद घेतांना त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा असतोआणि होळीची सांगता होते. असा नित्यक्रम रोज चालतो आणि त्यात मोठी माणसं फारसा हस्तक्षेप करीत नसल्यामुळे मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण असते. संध्या सातपुडा परीसरात सर्वत्र लहान मुलांच्या होळीची धुम सुरू आहे.

आदिवासी जीवन पध्दतीमध्ये समुह, सहकार्य आणि श्रम याला महत्त्वाचे स्थान आहे. याचा प्रत्यय आदिवासींच्या होळी सणामध्ये येतो. त्याची बिजे बालपणातच रुजली पाहिजे. यासाठी लहान मुलांच्या होळी सणाला सुरुवात झाली आहे. त्यांच्या होळी सणातही सर्व सहमतीने निर्णय घेतके जातात. ऐकमेकांना सहकार्य केले जाते. आणि प्रत्येक मुले यासणासाठी आपल्या आवश्यकतेनुसार श्रम करीत असतात. पुर्वपार चालत आलेल्या लहान मुलांच्या होणी सणाची परंपरा पिढयानपिढया आजही सुरूच आहे. याचा आनंद आहे. कालपरत्वे होळीच्या दांडा बांबुच्या ऐवजी ऐंरडी किंवा अन्य झाडांचा पेटविण्यात येत आहे. काही जुजबी बदल होत असले तरी लहान मुलांच्या होळी सणाची मूळ भावना मात्र कायम आहे. आणि येणाऱ्या पिढीनेही ही परंपरा अशीच सुरू ठेवावी.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज येथे पत्रकार लिंबराज गायकवाड यांची सदस्य पदावर निवड

दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी पत्रकारितेच्या क्षेत्रात सामाजिक बांधिलकी आणि निष्ठेने कार्य करणारे लिंबराज शंकरराव गायकवाड मौजे येवता ता.केज,जि. बीड यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा, केज येथे सदस्य पदावर निवड करण्यात आली. ही निवड पत्रकारितेतील त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची दखल म्हणून करण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.केज येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित कार्यक्रमात



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नियुक्ती जाहीर करण्यात आली.यावेळी सचिव विजय बिक्कड,तालुका उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड,तालुका कार्याध्यक्ष नंदकुमार मिसाळ,पांडुरंग कसबे, विश्वास राऊत,कृष्णा केदार,इलेक्ट्रिक बाइक शोरूमचे मालक मच्छिंद्र लांब साहेब,पत्रकार अशोक सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग कसबे यांनी केले. सचिव विजय बिक्कड यांनी संघटनेच्या स्थापने पासूनचा इतिहास आणि पत्रकार संघाची भूमिका याविषयी सविस्तर माहिती दिली.त्यांनी सांगितले की,पत्रकारिता ही केवळ बातमी देण्या पुरती मर्यादित नसून समाजातील सत्य,न्याय आणि पारदर्शकतेसाठी लढण्याचे प्रभावी माध्यम आहे.तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी नव्या सभासद लिंबराज गायकवाड यांना शुभेच्छा देत संघटनेच्या कार्यात सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी मनोगत व्यक्त करताना नंदकुमार मिसाळ यांनी आदर्श पत्रकारितेचे तत्त्व, जबाबदारी आणि सामाजिक कर्तव्य यावर सखोल विचार मांडले. त्यांनी सांगितले की, पत्रकारिता लोकशाहीचा चौथा स्तंभ असून तिची जबाबदारी अधिक मोठी आहे.सत्य आणि निष्पक्षता जपणे हीच खरी पत्रकाराची ओळख आहे.लिंबराज गायकवाड यांची निवड ही केवळ वैयक्तिक गौरवाची बाब नसून केज तालुक्यातील पत्रकारितेला बळकटी देणारी घटना ठरते. स्थानिक पातळीवर सक्षम,जबाबदार आणि समाजाभिमुख पत्रकारांची गरज लक्षात घेता,संघटनेत नव्या ऊर्जेची भर पडल्याचे चित्र दिसते.ही नियुक्ती भविष्यात संघटनेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना अधिक प्रभावी पणे वाचा फोडण्यास हातभार लावेल,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नियमानुसार वाटचाल करणार असल्याचे लिंबराज गायकवाड यांनी सांगितले.यावेळी त्यांनी पदाधिकारी यांचे आभार मानले आहेत.

# बचपन बाल विद्या मंदिर येथे शिवजयंती उत्साहात साजरी,वेशभुषा करत बाल शिवाजी साकारले



दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी बचपन बाल विद्या मंदिर या शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.यावेळी बाल विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज,जिजाऊ माता, मावळे अशा विविध वेशभूषेत सहभाग घेतला होता.लहानग्यांनी शिव चरित्रावरील भाषणे,घोष वाक्ये तसेच देशभक्तीपर गीते सादर करून बाल शिवाजी साकारत उपस्थितांची मने जिंकली शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या शौर्य,पराक्रम व आदर्श नेतृत्वाबद्दल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यां मध्ये देशप्रेम,शौर्य व संस्कारांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला.संपूर्ण कार्यक्रम आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.यावेळी बचपन बाल विद्या मंदिर च्या संचालिका सौ. वैशाली कराड मॅडम, ज्ञानेश्वरी मॅडम,कीर्ती मॅडम यांच्या सह पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी चौरे ज्ञानेश्वरी माणीक हिला सॉप्टबॉल खेळात कांस्यपदक



दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

बिलासपुर छत्तीसगड येथे दि.३ ते ८ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या ६९ व्या राष्ट्रीय सॉफ्ट बॉल स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.चौरे ज्ञानेश्वरी हिला कांस्य पदक मिळाले तसेच महाराष्ट्राच्या संघालाही कांस्यपदक प्राप्त झाले कांस्यपदक प्राप्त विद्यार्थिनी चौरे ज्ञानेश्वरी माणीक हिचा सत्कार बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष अड. उद्धवराव कराड साहेब यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी संकुलाच्या प्राचार्य डॉ.कविता गित्ते कराड मॅडम व संस्थेचे उपाध्यक्ष राजेश कापसे सर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# जि.प.उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत संत सेवालाल महाराज जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता. केज शाळेत संत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.संत सेवालाल महाराज यांचा जन्म दि.१५ फेब्रुवारी १७३९ रोजी एक श्रीमंत घराण्यात झाला.वडील भीमा नाईक व आई धर्मली माता.संत सेवालाल यांचा जन्म श्रीमंत घराण्यात होऊन सुद्धा त्यांनी बंजारा समाज मागासलेला असून अशिक्षित आहे तसेच अंधश्रद्धा यांमध्ये आहे.यामधून बंजारा समाजास उपदेश करून त्यांना सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे या विचाराने संत सेवालाल महाराज यांनी कार्य केले.अंधश्रध्दा नष्ट करणे,स्वच्छता, पशु संवर्धन आणि पाण्याचे महत्त्व तीनशे वर्षांपूर्वी त्यांनी भर दिला.त्यांनी नशेला दूर



ठेवा आणि सुखी जीवन जगा असा संदेश दिला.स्त्रियांचा सन्मान करा,मुली जीवंत देवी आहेत असे सांगून महिला सक्षमीकरणाचा पाया रचला.तसेच तांड्यात शिक्षण व स्वच्छतेचा प्रसार केला. अशा या महान संत सेवालाल महाराज यांचा मृत्यू दि.४ डिसेंबर१८०६ रोजी झाला.त्यांची समाधी वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथे आहे.असे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. या शाळेचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री.डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर व गणित विज्ञान विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री. संदीप मेघराज ठोंबरे सर, श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम, श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्री.राहुल बजरंग बचुटे सर,श्री. आबासाहेब तुळशिराम धपाटे सर,ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर यांनी केले व श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम यांनी आभार मानले.

# नगर परिषद किनवट येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

## नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन; जय शिवाजी, जय शिवरायच्या घोषणांनी सभागृह दणाणले,लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती

**दैनिक वादळ वार्ता**
**किनवट । प्रतिनिधी**

नगर परिषद किनवट येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात, भक्तीभावात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. नगर परिषद सभागृहात आयोजित मुख्य कार्यक्रमास शहरातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते करण्यात आले, तर अध्यक्षस्थानी उपनगराध्यक्ष मोहम्मद हसन खान पठाण होते. प्रमुख उपस्थिती म्हणून रा.कॉ. नेत्या बेबीताई नाईक यांची उपस्थिती लाभली. प्रारंभी शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जय शिवाजी, जय शिवरायच्या घोषणांनी संपूर्ण सभागृह दणाणून गेले होते.

याप्रसंगी नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांनी आपल्या भाषणात शिवरायांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी प्रशासनाची आठवण करून दिली. शिवरायांचे आदर्श आजच्या प्रशासनासाठी मार्गदर्शक आहेत. सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करणे हीच खरी शिवजयंतीची शिकवण आहे, असे त्या म्हणाल्या.

अध्यक्षस्थानावरून बोलताना उपनगराध्यक्ष मोहम्मद हसन खान पठाण यांनी शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्य संकल्पनेचा उल्लेख करून सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला.कार्यक्रमास सर्व सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका यामध्ये श्रीराम नारायणराव नेम्मानिवार (सभापती, सार्वजनिक बांधकाम समिती), श्रीमती अश्विनी आदर्श जागरलावार (सभापती, स्वच्छता व आरोग्य समिती), श्रीमती प्रिती धिरज नेम्मानिवार (सभापती, महिला व बालकल्याण समिती), श्रीमती निलोफर निसार भाटी (सभापती, पाणी पुरवठा समिती), श्रीमती नुरसबा शेख मुकद्दर (सभापती, क्रीडा व सांस्कृतिक समिती), यांच्यासह नगरसेवक संतोष किशनराव मरस्कोल्हे, गटनेते अभय मधुकर नगराळे, अपक्ष नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, सरोजिनी बाबुराव ओद्दीवार, प्रविण इंद्रसिंग राठोड, ललिताबाई मारोती मुनेश्वर, सुरज किशनराव सातुरवार, गंगाबाई नारायणराव कोल्हे, तसेच साजिद खान निसार खान (स्वीकृत सदस्य) यांची उपस्थिती होती. यासह माजी जि.प उपाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड, माजी जि.प सदस्य बंडु नाईक, ड. राहुल नाईक, उपसभापती राहुल नाईक, स्वागत आयनेनिवार, धिरज नेम्मानिवार, शहर प्रमुख प्रशांत कोरडे, राजेश जोशी, राजु सातुरवार, साहिल सिरमनवार, आदर्श जागर्लावार, प्रभु कोल्हे, मुक्कदर शेख, मुकेश नेम्मानिवार, ड. दिनेश येऊतकर, शिवसेना महिला तालुका संघटक मंगल तोकलवाड, प्रा. जयश्री भरणे, संगिता आडे, सागर गायकवाड, यांच्यासह बांडी यांची उपस्थिती होती.



मुख्याधिकारी मुगाजी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते तर नगर परिषद प्रशासनातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रमपूर्वक नियोजन करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. यावेळी कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, लेखापाल विष्णू पुजारी, अभियंता सुरज साखळे, नगर रचना अभियंता स्वानंद मामीडवार, अभियंता राहुल सातुरवार, करनिर्धारक शिवराम काहीतवाड, पाणी पुरवठा सहाय्यक राजू पिल्लेवार, किरण कलगोटूवार, फारुख खत्री, परमेश्वर कचमोडे, लक्ष्मण कोल्हे, साहिल कशेटवर, राजू उदगीरवार, जमीरोद्दीन, किरण दुधीवार, मोहनिश ढंडोरे, गंगाधर दोनपेल्लीवार व इतर सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन स्टॅलिन आडे यांनी केले तर आभार प्रदर्शन अशोक भालेराव यांनी केले. सराफराज खुरेशी यांनी शिवरायांच्या विचारांचा भव्य जागर केला. शिवजयंती निमित्त सभागृहात शिवकालीन पराक्रम, स्वराज्याची स्थापना, प्रशासनातील शिस्त आणि स्त्री सन्मान यांसारख्या विषयांवर थोडक्यात माहिती देण्यात आली. उपस्थितांनी शिवरायांच्या कार्याचा आदर्श अंगीकारण्याचा संकल्प व्यक्त केला. एकूणच, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किनवट शहरात देशभक्ती, अभिमान आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले.

# जेतवन बुद्ध विहार मालेवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील जेतवन बुद्ध विहार मालेवाडा येथे दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला बौध्द पंच कमेटी,भीमज्योती महिला मंडळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करून अभिवादन केले.याप्रसंगी विनोद बोरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.१६ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव 'जाणते राजे' होते की त्यांच्या राज्यातील प्रजा सुखी होती, आनंदी होती. शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नसून, रयतेच्या उत्पन्नाचे स्रोत आहे. शेती पिकली तर रयत सुखी, रयत सुखी तर राजा सुखी' हे सूत्र महाराजांना समजले होते.त्यामुळे



महाराजांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन रयतेला मजबुती देणारा होता. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज 'शेतकरी हितकर्ते राजे' होते.छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये शौर्य, धैर्य, सकारात्मकता, मुत्सद्देगिरी, युद्धनीती, दूरदृष्टी, व्यावहारिकता आणि चातुर्य असे अनेक गुण होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात सर्व धर्माचे, पंथांचे, जातीचे मावळे होते. जातीधर्माच्या मर्यादा ओलांडून स्वराज्यात सर्वांना शिवाजी महाराजांनी सामावून घेतले. त्यांचे विचार प्रत्येकाने आत्मसात करावे अशा शब्दात मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन केलं.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप मेश्राम यांनी केले.व आभार योगेश मेश्राम यांनी मानले.याप्रसंगी कार्यक्रमाला बौध्द पंच कमेटी, भीमज्योती महिला मंडळ,शालेय विद्यार्थी, गावातील नागरिक उपस्थित होते.

# १९१ बटालियन, केंद्रीय राखीव पोलीस दल कडून सिव्हिक क्शन प्रोग्रामचे आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**देसाईगंज । प्रतिनिधी**




दि. १८/०२/२०२६ रोजी १९१ बटालियन, केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) तर्फे दुर्गम व अतिनक्षलग्रस्त तुमरकोठी येथे सिव्हिक क्शन प्रोग्राम (CAP) आयोजित करण्यात आला. तुमरकोठी FOB ची स्थापना नुकतीच दि. १९/१२/२०२५ रोजी उठझऋव जिल्हा पोलिसांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आली आहे.

या कार्यक्रमांतर्गत CRPF कडून एक महिन्याचे शिवणकला प्रशिक्षण राबविण्यात आले. परिसरातील एकूण १० युवक-युवतींना प्रशिक्षण देण्यात आले असून सर्व प्रशिक्षार्थींना शिवणयंत्र व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. हे प्रशिक्षण व शिवणयंत्र त्यांच्या उपजीविकेचे साधन ठरण्याबरोबरच संपूर्ण परिसराच्या प्रगतीस नवी दिशा देणारे ठरणार आहे.

याशिवाय CAP अंतर्गत ग्रामपंचायतींना सामुदायिक वापरासाठी पाण्याची भांडी, कडछुल, प्लेट्स, प्लास्टिक खुर्च्या, सिंटेक्स पाण्याची टाकी आदी साहित्य वितरित करण्यात आले. ग्रामीणांना दैनंदिन वापरासाठी कंबळे व सोलर दिवे यांसारख्या आवश्यक वस्तूंचेही वाटप करण्यात आले. कार्यक्रमानंतर ग्रामीणांसाठी कॅम्पमध्ये भोजनाची व्यवस्था करण्यात आली. पूर्वी नक्षलग्रस्त असलेल्या या भागात कार्यक्रमामुळे ग्रामीणांमध्ये उत्साह व सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गडचिरोली रेंजचे डीआयजी अजय कुमार शर्मा यांनी भूषविले. त्यांच्यासोबत १९१ बटालियनचे कमांडंट सत्य प्रकाश तसेच एटापल्लीचे एसडीएम अमर राऊत उपस्थित होते. शर्मा व सत्य प्रकाश यांनी ग्रामीणांना संबोधित करताना CRPF ही क्षेत्रातील जनतेच्या सुरक्षा व मदतीसाठी सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. कोणतीही समस्या उद्भवल्यास जवळच्या कॅम्प किंवा पोलिस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले. तर अमर राऊत यांनी विविध शासकीय योजनांची माहिती ग्रामीणांना दिली. यावेळी साकेत विक्रम सिंह, सहाय्यक कमांडंट, निरीक्षक होननप्पा बी., पीएसआय साहू डंडे तसेच इतर अधीनस्थ अधिकारी-जवान व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# छत्रपती शिवरायांचे विचार जगाला तारतील-डॉ.गोविंद नांदेडे

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

स्वातंत्र्य, समता, बंधुता आदी विचार रयतेमध्ये तत्कालीन कालखंडात रूजवणारे छत्रपती शिवरायांचे विचार जगाला तारतील, असे प्रतिपादन राज्याचे पूर्व शिक्षण संचालक तथा विचारवंत डॉ. गोविंद नांदेड यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय मराठा पार्टीच्या वतीने सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा आयटीआय जवळ संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मनोज कासलीवाल तर उद्घाटक डॉ. गोविंद नांदेडे, प्रमुख पाहुणे म्हणून पंडित पवळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून जिजाऊ वंदनेने झाली.





या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा संयोजक राष्ट्रीय मराठा पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुरेश पाटील घोरबांड यांनी केले. यावेळी प्रतिष्ठेचा शिवभूषण पुरस्कार सुभाष खवास व बळीराम मुधाळे यांचा मान्यवरांच्या हस्ते शिवसन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व ग्रंथ भेट देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी उपस्थितांना प्रसिद्ध विचारवंत तथा उद्घाटक डॉ. गोविंद नांदेडे यांनी छत्रपती शिवरायांचे विचार आजच्या समाजालाही प्रेरणादायी असल्याचे सांगून आयोजक सुरेश घोरबांड यांचे आजपर्यंतच्या सामाजिक, धार्मिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. अध्यक्षीय समारोपात डॉ. मनोज कासलीवाल यांनी आज समाजात नीतीमूल्याची घसरण होत असताना अशा महापुरूषांचे विचार आजच्या पिढीने अंगीकारावे. तसेच पंडित पवळे यांनी यथोचित विचार मांडले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. जयश्रीताई ढेंबरे, सौ. मीराताई कोरडे, सौ. कुंताताई काळे, सौ. आशा उगले, सौ. लक्ष्मी खानसोळे, सौ. शिल्पा दुटके, ज्योती पाटील, कु. दिव्या काळे, संजय पा. काळे, कु. मानवी काळे, गायत्री दुटके, वैष्णवी ढेंबरे, कोमल ढेंबरे, माधव पाटील, तुकाराम कराळे, तेजपालसिंघ गिरणीवाले, केशवराव जाधव, सुनील काळे यांनी परिश्रम घेतले. यावेळी शिवभक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शेवटी आभार माधव रातोळीकर यांनी मानले.

# सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती, नांदेड यांच्या वतीने धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांना प्रतिष्ठेचा शिवधर्म सेवा श्री पुरस्कार प्रदान

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

शिवछत्रपतींच्या जयंतीनिमित्त आयोजित या सोहळ्याने सामाजिक कार्याला सन्मानाची सुवर्णझळाळी मिळाली. हा दिलीप ठाकूर यांचा १०९ वा पुरस्कार ठरला.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.*

वैद्य हॉस्पिटलसमोरील भव्य पेंडॉलमध्ये सकाळी ११ वाजता हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. स्वागतध्यक्ष अनिल धामणे पाटील यांनी ड. दिलीप ठाकूर यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. संयोजक भास्कर हंबर्डे यांनी प्रास्ताविकातून पुरस्कारामागील उद्देश स्पष्ट करताना दिलीपभाऊंच्या २२ वर्षांच्या सातत्यपूर्ण समाजसेवेचा गौरवपूर्ण आढावा घेतला.१५ लाखांहून अधिक अन्नदान,



हजारो बेघरांना चादरी, छत्र्या व चप्पलांचे वितरण, तसेच दरमहा रस्त्यावरच्या निराधारांची सेवा अशा उपक्रमांचे कौतुक यावेळी करण्यात आले.

डॉ. शीतल भालके, दिलीपसिंघ सोडी, संतोष शिंदे, उदयसिंह कच्छवे, कैलाश कुंटूरकर आणि अमित मोदी यांच्या हस्ते शिवधर्म सेवा श्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी दिलीपभाऊंच्या अन्नदान, वस्त्रदान, मानवता फ्रिज, अमरनाथ यात्रा तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचा विशेष उल्लेख करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

पुरस्कार स्वीकृत करताना ड. दिलीप ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले. हा सन्मान माझा नसून समाजातील त्या सर्व स्वयंसेवकांचा आहे, जे निरपेक्ष भावनेने सेवाकार्यात सहभागी होतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचवणे हेच माझे ध्येय आहे, असे ते म्हणाले. त्यांनी समितीचे आभार मानत पुढेही सेवा कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमास विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्स्फूर्त टाळ्यांच्या गजरात संपन्न झालेल्या या सोहळ्याने शिवजन्मोत्सव अधिक संस्मरणीय ठरला.

# हिमायतनगर तालुक्यातील वारंगटाकळी येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

हिमायतनगर तालुक्यातील मौजे वारंगटाकळी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महाराजांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करून व विधिवत पूजन करून करण्यात आली.

या प्रसंगी गावातील ज्येष्ठ नागरिक आबा रावजी पाटील, पोलीस पाटील अवधूत कदम, सरपंच दयाळगिरी गिरी, तसेच तंटामुक्ती अध्यक्ष अवधूत किशनराव हाके पाटील यांच्या हस्ते पूजन संपन्न झाले.

यानंतर उपस्थितांनी जिजाऊ वंदना ग्रहण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमस्थळी शिवप्रेमी नागरिकांसह विविध धर्म व जातीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन शिवरायांच्या विचारांना अभिवादन करत सामाजिक एकतेचा संदेश दिला. या शिवजयंती सोहळ्यामुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, छत्रपती शिवाजी






महाराजांचे आदर्श, त्यांचे शौर्य, नेतृत्व आणि स्वराज्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

# आदर्श शैक्षणिक संकुलात शिवजयंती उत्साहात

## हा सत्कार माझा नव्हे,तर 'शिवविचारांचा' सन्मान!-प्रमुख पाहुणे पत्रकार तुषार महाजन

## सोशल मीडियाच्या युगात दिशा हवी असेल तर 'शिवचरित्र' हाच दीपस्तंभ!

दैनिक वादळ वार्ता
**शिर्डी | प्रतिनिधी**

शिर्डी येथील आदर्श शैक्षणिक संकुलातील 'आदर्श बाल प्राथमिक, माध्यमिक विद्यामंदिर व इंग्लिश मीडियम स्कूल'मध्ये शिवजयंतीचा उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. शिवचरित्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या विशेष व्याख्यान सोहळ्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रबोध जोशी सर आणि सचिव अशोकभाऊ गोंदकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**शिवव्याख्याते प्रफुल्ल खपके यांचे मार्गदर्शन**

कार्यक्रमात शिवव्याख्याते श्री. प्रफुल्ल खपके यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून शिवरायांचा जाज्वल्य इतिहास उलगडला. त्यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, स्वराज्य स्थापनेची जिद्द आणि रयतेविषयीचे प्रेम यावर मार्गदर्शन करत शिवचरित्र केवळ वाचण्यासाठी नसून ते आचरणात आणण्यासाठी आहे, हा विचार विद्यार्थ्यांच्या मनात रुजवला.

**उत्कृष्ट नियोजन आणि सांगता**

या संपूर्ण कार्यक्रमाचे अतिशय सुंदर आणि नेटके नियोजन धनवटे मॅडम, रोकडे मॅडम, खरात मॅडम, नन्नवरे मॅडम आणि उगले मॅडम यांनी केले. या दिमाखदार सोहळ्याचे सूत्रसंचालन त्रिभुवन मॅडम यांनी अतिशय बहारदारपणे केले. तर, कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार श्री. भोगडे सर यांनी मानले.




### हा सन्मान केवळ माझा नसून 'शिवविचारांचा' आहे-पत्रकार तुषार महाजन

या शानदार कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लेखक, पत्रकार तसेच ग्रीन फाउंडेशनचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष तुषार संजय महाजन उपस्थित होते. यावेळी विद्यालयाच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर ते म्हणाले, शिवरायांचे विचार, हेच आमचे संस्कार! आदर्श विद्यालयाने केलेला हा माझा सन्मान नसून तो खऱ्या अर्थाने शिवविचारांचा सन्मान आहे, असे मी मानतो. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील चमक आणि त्यांच्या मुखातून निनादलेला 'जय भवानी, जय शिवाजी'चा नाद मनाला एक वेगळीच सकारात्मक ऊर्जा आणि प्रेरणा देऊन गेला. आजच्या पिढीने शिवरायांचे धैर्य अंगी बाणवणे गरजेचे आहे.

# पाच वर्षाच्या उबेदचा रोजा

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे | केज**

मुस्लिम धर्मीय बांधवांचा रमजान महिना अत्यंत पवित्र समजला जातो. तर या महिन्यात असलेले उपवास हे अत्यंत कठीण असतात. पाणीच काय पण उपवासात थुंकी सुद्धा गिळली जात नाही. एवढे हे रमजानचे उपवास अर्थात रोजाचे उपवास कठोर असतात. एवढे कठीण उपवास हे केज शहरातील अवघ्या पाच वर्ष वयाच्या उबेद सय्यद याने ठेवले आहेत.



माजी सरपंच हाजी वाहेदाबी सय्यद आणि माजी पंचायत समिती सदस्य हाजी सय्यद नवाब मामू यांचे चिरंजीव जमीर सय्यद यांचा अवघे पाच वर्ष वयाचा चि. उबेद सय्यद याने पवित्र रमजान महिन्यातील रोजाचे उपवास सुरू केले आहेत. त्यांच्या घरात पूर्वी पासून धार्मिक वातावरण आहे. सय्यद उबेद यांचे आजी हाजी सय्यद वाहेदाबी या साळेगावच्या माजी सरपंच तर आजोबा हाजी सय्यद नवाब मामू हे केज पंचायत समितीचे माजी पंचायत समिती सदस्य होते. तसेच चुलत आजोबा हाजी सय्यद नूर मामू हे देखील साळेगावचे माजी सरपंच आणि चुलते डॉ. जे. एन. सय्यद हे माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम केले आहे. सय्यद कुटुंब यांच्या घरात पूर्वी पासून धार्मिक वातावरण असल्याने त्याने रोजाचे उपवास ठेवल्याने चि. उबेद यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पात्रुड येथे शिवजयंतीचा उत्साह; रक्तदान शिबिरासह २७ फेब्रुवारीला शिवव्याख्याते राकेश पिंजण यांचे व्याख्यान

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव | प्रतिनिधी**

तालुक्यातील पात्रुड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावर्षी गावात ग्रामपंचायत प्रशासन आणि सार्वजनिक उत्सव समितीच्या वतीने दोन स्वतंत्र सोहळे आयोजित करण्यात आले असून, सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले होते.



या मंगल प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन पात्रुड गावचे सरपंच नौशाद लतिफ मोमीन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. वसीम मनसबदार, माजी सरपंच एकनाथ मस्के, भागवत भुजबळ, एमआयएमचे युसूफ भाई, ज्येष्ठ मार्गदर्शक भुजबळ मामा, उपसरपंच घनश्याम भुतडा आणि पत्रकार धैर्यशील ढगे, अमित चांदमारे उपस्थित होते. याप्रसंगी ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, सर्व आयोजक मंडळी आणि गावातील तरुण शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.


हेमाडपंथी गणपती मंदिरात रंगणार वैचारिक प्रबोधन केवळ मिरवणुका न काढता शिवरायांचे विचार घराघरात पोहोचावेत, या उद्देशाने सार्वजनिक उत्सव समितीच्या वतीने दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. गावातील ऐतिहासिक हेमाडपंथी गणपती मंदिर या ठिकाणी हे व्याख्यान पार पडणार आहे. यावर्षीचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रसिद्ध शिवव्याख्याते राकेश पिंजण सरकार हे आपल्या अमोघ वाणीतून शिवचरित्रावर प्रकाश टाकणार आहेत. या बौद्धिक मेजवानीचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस कर्मचारी शेख हारून आणि अशोक मिसाळ यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. सामाजिक उपक्रम आणि राकेश पिंजण यांच्या व्याख्यानामुळे पात्रुड येथील शिवजयंती उत्सवाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज सर्व जाती धर्माचे राजे होते-श्रुती जाधव

दैनिक वादळ वार्ता
**येवता | प्रतिनिधी**

दि.१९/०२/२०२६ रोजी केज तालुक्यातील येवता येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज,जिजाऊ माता, मावळे अशा विविध वेशभूषेत सहभाग घेतला होता. शिवचरित्रावरील भाषणे,घोषवाक्ये तसेच देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिवव्याक्ती कु.श्रुती गजेंद्र जाधव यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम व आदर्श नेतृत्वाबद्दल मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामस्त,विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम,शौर्य व संस्कारांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात पार व्यवसायातील ग्रामस्थांनी श्रुती जाधव यांचे सर्व स्तरातून कौतुक केले.

# डॉ.रामानुजन इंग्लिश स्कूलमध्ये शिवकालीन खेळांसह छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
**उमरगा | महंमदरफी शेख**

डॉ. रामानुजन इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंतीनिमित्त विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी शिवाजी महाराजांचे अनुशासन या विषयावर भाषण स्पर्धा, शिवाजी महाराजांचे किल्ले या विषयावर चित्रकला स्पर्धा तसेच उठाबशा स्पर्धा घेण्यात आली. मुलींनी शिवाजी महाराजांवरील गौरवगीत सादर करून त्यावर आकर्षक नृत्य सादर केले.प्रमुख पाहुण्या सौ. वंदना मोरे यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्या एक आदर्श आजी, माता, पत्नी, शेतकरी व उत्तम प्रशासक म्हणून परिचित आहेत. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष महेश अंबर, सचिव गुलाब माळी, प्रमुख मार्गदर्शक तथा माजी गटशिक्षणाधिकारी शुभाष चव्हाण, धैर्यशील जाधव, तेलंग सर, क्रीडा शिक्षक महमदरफी शेख आदी मान्यवर उपस्थित होते.



विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी लाठी व दांडपट्टा यांसारख्या शिवकालीन खेळांचे चित्तथरारक प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्या गंगा अंबर तसेच दुर्गा बिद्री, श्रीनिधी घोडके, संध्या ममाले, कांचन खंडाळकर, दीपा बोडके, विवेक कांबळे, कल्याणी बबलादे, उज्वला धुमाळ, प्राजक्ता गुरव, अनिता गडदे आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# न्याय, स्वाभिमान आणि स्त्रीसन्मान हीच स्वराज्याची खरी ओळख-प्रा.अंकुश निर्मळ

## राजे मल्हारराव होळकर निवासी वसतिगृहात शिवजयंती सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात स्वराज्याची प्रेरणा जागवण्याचे महान कार्य राजमाता जिजाऊंनी केले. रयतेला न्याय, महिलांना सन्मान आणि समाजात स्वाभिमान निर्माण व्हावा, याच उदात्त ध्येयातून स्वराज्याची संकल्पना आकारास आली, असे प्रतिपादन धनगर कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा.अंकुश निर्मळ यांनी केले.

तुलसी शैक्षणिक समूह संचलित राजे मल्हारराव होळकर निवासी वसतिगृह, बीड येथे गुरुवार दि. १९ रोजी शिवजयंतीनिमित्त आयोजित व्याख्यान व बक्षीस वितरण सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते.तर, प्रमुख अतिथी म्हणून मल्हार सेना बीडचे जिल्हाप्रमुख मा.अमर ढोणे, मा.बळीराम खरात, डॉ.सुनील जोंधळे तसेच प्रा.डी.डी.राऊत उपस्थित होते. प्रा.अंकुश निर्मळ यांनी बिरुदेव ढोणे यांच्या कार्याचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना सांगितले की, शिक्षण हीच उन्नतीची खरी वाट आहे. उच्च पदांची स्वप्ने पाहा आणि स्पर्धा परीक्षांसाठी सातत्याने परिश्रम घ्या. मात्र केवळ पद किंवा नोकरी मिळवणे हेच यश नसून सद्गुण, चारित्र्य जोपासून एक सक्षम नागरिक बनणे हेच खरे यश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रमुख पाहुणे अमर ढोणे यांनी, संस्थेच्या संघर्षाचे खरे यश विद्यार्थ्यांच्या आनंदात दिसून येते, असे सांगत शिवविचारांच्या मार्गाने समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्रा.प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास साधावा, प्रभावी वक्तृत्व विकसित करावे आणि प्रत्येक स्पर्धेत उत्साहाने सहभाग घ्यावा, असे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अठरापगड सवंगड्यांच्या मैत्रीचा आदर्श घेऊन निष्ठावान, प्रेरणादायी मित्र निवडावेत, असे त्यांनी नमूद केले.



यावेळी वसतिगृहात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना शिवरायांच्या विचारांतून प्रेरणा घेत समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.किशोर वाघमारे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.गीतांजली वाघमारे तर आभार प्रदर्शन प्रा.डी.डी.राऊत यांनी मानले. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी प्रा.मगन ओव्हाळ, सत्यजित सावंत, आरती सावंत, वर्षा ढोकणे, शीतल खराद व गौरव विद्यागर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विवाहितेच्या छळाच्या गुन्ह्यात सासरकडील आरोपींना मोठा दिलासा; बीड जिल्हा व सत्र न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याच्या आरोपाखाली भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ८५, ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५)

गुन्हा दाखल असलेल्या सासरच्या मंडळींना बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या प्रकरणातील संशयित आरोपींना न्यायालयाने 'अटकपूर्व जामीन' मंजूर करत अटकेपासून संरक्षण दिले आहे.

**नेमके प्रकरण काय?**

संबंधित पीडित महिलेने सासरच्या मंडळींविरुद्ध तक्रार दिली होती. या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ८५, ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला होता. अटकेची टांगती तलवार असल्याने सासरच्या नातेवाईकांनी वकिला मार्फत बीड जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली होती.



ॲड.शेख सद्दाम शेख इस्माईल यांचा यशस्वी युक्तिवाद:या अर्जावर सुनावणी दरम्यान बचाव पक्षाच्या वतीने ॲडव्होकेट शेख सद्दाम शेख इस्माईल यांनी अत्यंत प्रभावी कायदेशीर बाजू मांडली. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, आरोपींवरील आरोप हे पुर्नपने चुकीचे व खोटे सरसकट स्वरूपाचे असून तपासासाठी त्यांची कोठडीत रवानगी करण्याची कोणतीही तांत्रिक आवश्यकता नाही. आरोपी पोलिसांना तपासात पूर्ण सहकार्य करण्यास बांधील आहेत. या कायदेशीर प्रक्रियेत ॲड. सद्दाम शेख यांना ॲड. आदर्श अरूणराव जाधव ॲड.विनय मा. कुलकर्णी आणि ॲड. दिनेश विनायकराव जाधव यांनी मोलाचे सहकार्य केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077